# अधिसुचना

उपविभागीय अधिकारी, सावनेर यांचे कार्यालय प्रशासकीय इमारत, पहिला मजला, छिंदवाडा रोड, सावनेर जि. नागपुर

जा.क्रं.अ.का-२/भु.सं./उविअ/सा/कावि- ६८८

दिनांक ३० /०९/२०२५

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ व सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९७ नुसारच्या (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१८ अन्वये कलम ११ (१) खालील अधिसुचना**

ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (३) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७ (भाग-२)/अ-२, दि. ११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल,

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, नागपुर जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदींन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चारमध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोटकलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.



CamScanner

परंतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीचीकारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निदेश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी **श्री संपत खलाटे उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, सावनेर** यांस पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची - एक**

**जमिनीचे वर्णन**

**भुसंपादन प्रकरण क्रमांक ०३/अ-६५/२०२५-२६ प. ह. न. ५३**

**गाव — रनाळा** **तालुका — सावनेर** **जि. — नागपुर**

| अ.क्र. | भुमापन किंवा गट क्र. | संपादन करावयाचे क्षेत्र (हे. आर मध्ये) |
|---|---|---|
| १ | २११/१ | १.५८ |
| २ | २१२ | १.७२ |
| ३ | २१३ | ०.७५ |
| ४ | २१५ | ०.७८ |
| ५ | २१६ | २.०३ |
| ६ | २१९ | ०.७८ |
| ७ | २२० | ०.६५ |
| ८ | २२१ | १.६९ |
| ९ | २२२ | ०.२४ |
| १० | २२३ | ०.८३ |
| ११ | २२४ | ०.७६ |
| १२ | २२५ | ०.३ |
| १३ | २२६ | १.०६ |
| १४ | २२७ | २.०२ |
| १५ | २२८ | ०.८६ |
| १६ | २३१ | १.३७ |
| १७ | २३२ | १.१३ |
|  | एकुण | १८.५५ |



CamScanner

## अनुसूची — दोन
## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| | |
|---|---|
| प्रकल्पाचे नाव | :- मौजा बिना, ता.कामठी, जि.नागपूर या गावाचे पुनर्वसन करणेबाबत |
| प्रकल्प कार्याचे वर्णन करण्याबाबत. | :- मौजा बिना ता.कामठी, जि.नागपूर या गावाचे पुनर्वसन करण्याकरीता खाजगी जमिन भुसंपादन |
| समाजाला मिळणारे लाभ | :- मौजा बिना ता.कामठी, जि.नागपूर या गावाचे पुनर्वसन मौजा रनाळा येथे करण्यात येणार आहे. |

## अनुसूची — तीन

| | |
|---|---|
| बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे | :- विस्थापित होत नाहीत |

## अनुसूची — चार

| | |
|---|---|
| सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश | भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३(२०१३ चा ३०) महाराष्ट्र राज्याला लागू असतांना (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१८ याच्या कलम १० (क) नुसार राज्य शासनाने महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग यांचेकडील शासन राजपत्रातील अधिसूचना क्र. एसआयए-२०२५/ प्र.क्र.-२४/भुसंपादन —१ दिनांक ०४, सप्टेंबर २०२५ अन्वये प्रकरण २ व ३ च्या तरतूदी लागू करण्यापासून सूट देण्यात आलेली आहे. |

## अनुसूची — पाच
## नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल

अ) प्रशासक म्हणुन नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे पदनाम :- निरंक .

ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता :- निरंक

क) ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसुचनेचा तपशिल :- निरंक.

टिप :- उक्त जमिनीच्या आराखड्याचे **उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, सावनेर यांचे कार्यालय सावनेर** येथे निरीक्षण करता येईल.

दिनांक :- 10/०९/२०२५
ठिकाण :- सावनेर

(संपत खलाटे)
**उपविभागीय अधिकारी तथा**
**भुसंपादन अधिकारी, सावनेर**



CamScanner